## ××××× प्रकरण दुसरे ×××××

## ××××× पं· भीष्माचार्यांचा परिचय आणि वाङ्मय कर्तृत्व ×××××

## प्रकरण दुसरे

## पं·भीष्माचार्यांचा परिचय आणि वाङ्मयीन कर्तृत्व

महानुभावीय साहित्यिकांची वाङ्मयपरंपरा खूप मोठी आहे· तेराव्या-चौदाव्या शतकात मराठी वाङ्मय लिहिताना वाङ्मयातील विविध वाङ्मयप्रकारांची जाणीव त्यांना कदाचित नसावी. हे विविध वाङ्मयप्रकार हाताळण्याचा त्यांचा उद्देश नसला तरी या पंथातील साहित्यिकांनी मराठी वाङ्मयात खूपच भर घातली आहे· चरित्रलेखन, स्थलवर्णन, पंथीय तत्वज्ञान, पंथाचा आचारधर्म सांगणारे ग्रंथ, कथा, काव्य, टीका-भाष्य या वाङ्मय-प्रकारांबरोबरच त्यांनी छंदशास्त्र, भाषाशास्त्र व व्याकरण या वाङ्मयप्रकारातही महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे· कवीश्वर व्यास, आनेराज व्यास, पं·भीष्माचार्य आणि पं·विश्वनाथ वर्धनस्थ बीडकर या चार महानुभावीय व्याकरणकारांनी मराठी भाषेचे व्याकरण तयार करण्याचा प्रयत्न त्या काळात केला· त्यांनी लिहिलेली व्याकरणे आज अपूर्ण वाटत असली तरी सातशे वर्षापूर्वीचा त्यांचा हा प्रयत्न निश्चितच उल्लेखनीय म्हणावा लागेल· शिवाय मराठी भाषेच्या व्याकरणाच्या दृष्टीने तो उपकारकच ठरला आहे·

### "पंचवार्तिक"कार भीष्माचार्य कोण ?

महानुभाव पंथातील चार व्याकरणकारांपैकी पं·भीष्माचार्य यांनी "नामविभक्ती" व "पंचवार्तिक" हे दोन ग्रंथ लिहून मराठीचे भाषाशास्त्र व व्याकरण यांत विशेष भर घातली· त्यांचा "पंचवार्तिक" हा ग्रंथ मराठी व्याकरणाच्या दृष्टीने विशेष उल्लेखनीय होय· महानुभावीय पंथात भीष्माचार्य या नावाच्या अनेक व्यक्ती होऊन गेल्या· त्यांची संख्या तीनपासून आठ पर्यंत वेगवेगळ्या अभ्यासकांनी सांगितली आहे· यांच्यापैकी "पंचवार्तिक"कार भीष्माचार्य नेमके कोणते, हा एक वादाचा विषय झालेला आहे· याबाबत वेगवेगळी मते मांडली जातात·

"महानुभाव महाराष्ट्र ग्रंथात्ली कविकाव्यसूचि"त वि·ल·भावे यांनी पाच भीष्माचार्यांचा उल्लेख केला आहे·

१. पंडित बोपदेवशिष्य हे पहिले भीष्माचार्य· यांच्या नांवावर एकूण एकोणतीस ग्रंथांची नोंद आहे· त्या ग्रंथात "पचवार्तिकं" या ग्रंथाचाही समावेश आहे·

२. भिवबा लासूरकर हे दुसरे भीष्माचार्य होत·

३. व ४. तिसरे भीष्माचार्य व चौथे भीष्माचार्य म्हणून वाइंदेशकर भीष्माचार्यांचा उल्लेख केला जातो·

५. "मूर्तिप्रकाश सुभाषित प्रदीपिका" हा ग्रंथ लिहिणारे भीष्माचार्य हे पाचवे भीष्माचार्य होत·

या पाच भीष्माचार्यांपैकी पं·बोपरदेवशिष्य भीष्माचार्यांच्याच नांवावर "पंचवार्तिक" या ग्रंथाची नोंद आढळून येते·[१]

महानुभाव पंथात भीष्माचार्य नावाचे तीन ग्रंथकार होऊन गेल्याचे वि·ल·भावे यांनी "महाराष्ट्र सारस्वत" या ग्रंथात सांगितले आहे· या तिघांपैकी एक चौदाव्या शतकात, दुसरा पंधराव्या शतकात तर तिसरा सोळाव्या शतकात होऊन गेल्याचे ते सांगतात· यांच्यातील चौदाव्या शतकात होऊन गेलेल्या भीष्माचार्यांच्या नांवावर तीस-बत्तीस ग्रंथांची नोंद असून त्या ग्रंथात "नामविभक्ती" व 'पंचवार्तिक" या दोन ग्रंथांचीही नोंद असल्याचे त्यांनी सांगितले आहे· हा भीष्माचार्य चारशे वर्षापूर्वी होऊन गेला असावा, असेही मत भावे यांनी नमूद केले आहे·[२] याच "महाराष्ट्र सारस्वत" ग्रंथाच्या पुरवणीत डॉ·श·गो· तुळपुळे यांनी, "पंचवार्तिक"कार भीष्माचार्य हा चौदाव्या शतकातला नसून तो तेराव्या शतकात होऊन गेला असल्याचे मत मांडले आहे· त्याचा "पंचवार्तिक" हा व्याकरणशास्त्रावरील ग्रंथ असून तो आनेराज बासांच्या "लक्षणरत्नाकर" या संस्कृत ग्रंथाचा मराठी अनुवाद आहे· हा मराठी भाषेतील व्याकरणशास्त्रावरील आद्य ग्रंथ असल्याचेही डॉ·तुळपुळे सांगतात·[३] म्हणजे वि·ल·भावे यांना जो चौदाव्या शतकातील भीषमाचार्य अभिप्रेत आहे त्याला डॉ·तुळपुळे तेराव्या शतकातील म्हणतात· "पंचवार्तिक" यानेच लिहिले, यात मात्र दोघांत एकवाक्यता आहे·

डॉ·अ·ना·देशपांडे यांनी मराठी वाङ्मयाच्या इतिहासात "पंचवार्तिक"कार भीष्माचार्यांविषयी पुढीलप्रमाणे माहिती दिली आहे·[४] महानुभाव संप्रदायात चार भीष्माचार्य झालेले आहेत·

१. पारमांडल्य आम्नायात इ·स· १३८८ च्या सुमारास होऊन गेलेले एक भीष्माचार्य· यांना भीष्माचार्य लासूरकर असे म्हणतात· हे भीष्माचार्य नागनाथांचे शिष्य असून यांनी आनेराजकृत सुभाषितांताक्षरी व हयग्रीवाचार्यकृत "गद्यराज" यांवर टीपसंस्कार केलेले आहेत·

२. उपाध्ये आम्नायातील पहिला भीष्माचार्य, हे दुसरे भीष्माचार्य· हे तेराव्या शतकात होऊन गेले· प्रसिध्द पंडित बोपदेव हे त्यांचे विद्यागुरू आणि न्यायबास हे दीक्षागुरू होत· त्यांनी "निरूक्तशेष" इ·ग्रंथाबरोबरच "नामविभक्ती" व "पंचवार्तिक" हे व्याकरणशास्त्रावरील ग्रंथ लिहिले·

३. उपाध्ये आम्नायातील दुसरा भीष्माचार्य, हे तिसरे भीष्माचार्य· यांनी उपाध्ये आम्नायातील पहिल्या भीष्माचार्यांचा निरूक्तशेष हा ग्रंथ संपादित केला आहे·

४. उपाध्ये आम्नायातील तिसरा भीष्माचार्य, हे चौथे भीष्माचार्य होत· हे इ·स· १६३१ च्या दरम्यान होऊन गेले· उपाध्ये आम्नायातील पहिला, दुसरा व तिसरा हे तिन्ही भीष्माचार्य "वाइंदेशकर भीष्माचार्य" या नांवानी ओळखले जातात·

महानुभाव वाङ्मयसूचीकार डॉ·आय·एम·पी·रेसाईड यांनी सहा भीष्माचार्यांचा उल्लेख केला आहे· त्यांच्यातील "पंचवार्तिक"कार भीष्माचार्यांचा कालखंड, ते इ·स·चे चौदावे शतक मानतात·[५] चौदाव्या शतकात होऊन गेलेले "हेतुस्थळ"कर्ते, न्यायबासांचे शिष्य भीष्माचार्य किंवा याच काळातील नागनाथबासांचे शिष्य भीष्माचार्य या दोघांपैकी कुणीतरी "पंचवार्तिक" लिहिले असावे, असे ह·ना·नेने यांचे अनुमान आहे·[६]

डॉ·भीमराव कुलकर्णी यांनी आठ भीष्माचार्यांचा उल्लेख केला असून "पंचवार्तिका" ची रचना पं·आनेराजबासांच्या "लक्षणरत्नाकर" या ग्रंथाच्या रचनेपूर्वी झाली असावी असे मत त्यांनी मांडले आहे·[७] "लक्षणरत्नाकर" हा ग्रंथ शके १२१८ मध्ये म्हणजेच इ·स· १२९६ मध्ये लिहिला गेला· याचाच अर्थ "पंचवार्तिका"ची रचना इ·स·१२९६ पूर्वीची असावी

असे डॉ॰कुलकर्णी यांना वाटते॰ तसेच "बत्तीस लक्षणाची टीप" हा ग्रंथ उपाध्ये आन्नायातील तिस-या भीष्माचार्यांचा असल्याचे ते मानतात॰ हा ग्रंथ त्याने शके १५६३ मध्ये लिहिला असल्याचेही डॉ॰कुलकर्णी सांगतात॰ हा भीष्माचार्य विव्दान असून "पंचवार्तिक"कार भीष्माचार्य विव्दान नसावेत, असे डॉ॰कुलकर्णी यांना वाटते॰ कारण "पंचवार्तिका"त भीष्माचार्यांच्या विव्दत्तेचा तसा विशेष प्रत्यय येत नसल्याचे त्यांचे मत आहे॰[८] डॉ॰कुलकर्णी यांचा असाही एक तर्क आहे की, "हेतुस्थळ" हा ग्रंथ लिहिणारे उपाध्ये आन्नायातील न्यायबासाचे शिष्य जे भीष्माचार्य यांनी शके ११५३ मध्ये "पंचवार्तिक" हा ग्रंथ लिहिला असावा॰[९] परंतु "लक्षणरत्नाकर" आणि "पंचवार्तिक" हे दोन्हीही ग्रंथ पारमांडल्य आम्नायातील असल्याने, या आन्नायातील नागनाथबासांचे शिष्य जे भीष्माचार्य यांनी "पंचवार्तिक" लिहिले असावे अशी शक्यताही डॉ॰कुलकर्णी व्यक्त करतात॰[१०]

डॉ॰य॰खु॰देशपांडे यांनी तीन भीष्माचार्यांचा उल्लेख केला आहे॰ बोपदेवशिष्य पहिले भीष्माचार्य हे तेराव्या शतकातील तर "पंचवार्तिक"कार भीष्माचार्य हे चौदाव्या शतकातील होत, असे मत देशपांडे यांनी मांडले आहे॰[११] शके १४६० मध्ये "निरुक्तशेष" हा ग्रंथ लिहिणारे भीष्माचार्य हे उपाध्ये आन्नायातील व्दितीय भीष्माचार्य वाइंदेशकर असावेत, असे य॰खु॰देशपांडे यांचे मत आहे॰[१२] निरुक्त हे व्याकरणशास्त्राचे पूरक अंग असून "निरुक्तशेष" हा अत्यंत व्यवस्थित ग्रंथ असल्याचे डॉ॰भीमराव कुलकर्णी सांगतात॰ तसेच हा ग्रंथ शके १३०० च्या सुमारास लिहिला असण्याची शक्यताही ते वर्तवितात॰[१३]

"पचवार्तिका"त विव्दत्ता दिसून येत नाही; म्हणून "पंचवार्तिक"कार भीष्माचार्य हे विव्दान नसावेत, असे मत एका बाजूला डॉ॰भिमराव कुलकर्णी मांडतात तर दुस-या बाजूला "निरुक्तशेष" हा व्यवस्थित ग्रंथ असल्याचेही ते सांगतात॰ तसेच पं॰भीष्माचार्यांनी तो शके १३०० च्या सुमारास लिहिला असावा असे अनुमानही त्यांनी काढले आहे॰ त्याचप्रमाणे "पंचवार्तिक" हे "लक्षणरत्नाकर" या ग्रंथरचनेपूर्वी म्हणजेच शके १२१८ पूर्वी लिहिले असावे असे एकीकडे ते सांगतात, तर दुसरीकडे पं॰भीष्माचार्य हे शके १२१८ नंतरच्या उपाध्ये आन्नायातील न्यायबासाचे शिष्य किंवा नागनाथबासांचे शिष्य असावेत, असा तर्क ते व्यक्त करतात॰ डॉ॰भीमराव कुलकर्णी यांची स्वतःचीच ही विस्कळीत व परस्परविसंगत विधाने पाहिल्यावर "पंचवार्तिक"कार भीष्माचार्यांविषयी व त्यांच्या कालखंडाविषयी अधिकच गुंतागुंत वाढून गोंधळ निर्माण होतो॰[१४]

महानुभाव पंथात भीष्माचार्य नावाच्या अनेक व्यक्ती होऊन गेल्यामुळे आणि या साहित्यिक भीष्माचार्यांनी त्यांच्या वाङ्‌मयात आपला सविस्तर परिचय न दिल्याने "पंचवार्तिक"कार भीष्माचार्य नेमके कोणते, हा एक वादाचा विषय निर्माण झाला आहे· याबाबत अभ्यासकात एकवाक्यता दिसून येत नाही· तरीही विविध मते-मतांतराच्या आतापर्यंतच्या विवेचनावरून काही निष्कर्ष निघतात ते असे -

१. "पंचवार्तिक"कार भीष्माचार्य हे उपाध्ये आम्नायातील असून ते पं·बोपदेव यांचे शिष्य आहेत· महानुभावीयांच्या शिष्यपरंपरेतही याबाबत असाच उल्लेख आहे·[१५]

२. "हेतुस्थळ"कर्ते न्यायबासानी "पंचवार्तिकां"चे शोधन शके १२७५ मध्ये केले· याचा अर्थ "पंचवार्तिकांची रचना" शके १२७५ पूर्वीच झाली होती, हे उघड आहे· यावरून असे अनुमान काढता येते की, "पंचवार्तिक"कार भीष्माचार्य तेराव्या शतकातील असले पाहिजेत·

३. "पंचवार्तिक"कार भीष्माचार्य व "पंचवार्तिक अन्वयकार" भीष्माचार्य हे वेगवेगळे दोन भीष्माचार्य होऊन गेले·

## पंडित भीष्माचार्यांचे पूर्वचरित्र

मराठी भाषेतील "आद्य मराठी व्याकरण" ज्याने तयार केले, ते "पंचवार्तिक"कार भीष्माचार्य नेमके कोणते, याबाबत अभ्यासकांत एकवाक्यता नाही· महानुभाव पंथात आठ भीष्माचार्यांचा उल्लेख आढळतो· त्यांच्यापैकी "पंचवार्तिक" लिहिणारे भीष्माचार्य कोणते, हा एक वादाचा विषय झाला आहे· प्राचीन काळी साहित्यिकांचा साहित्य लिहिण्याचा हेतू प्रसिध्दी मिळविणे हा खचितच नसावा· कारण तसा हेतू असता तर प्रत्येक साहित्यिकाने स्वतःबद्दलची माहिती आपल्या प्रत्येक ग्रंथात कुठेतरी लिहून ठेवली असती· परंतु असे घडलेले दिसून येत नाही· महानुभावीय साहित्यिकांनी तर पंथनिष्ठा आणि पंथप्रचार या प्रमुख उद्देशांनीच लेखन केले· याला "पंचवार्तिक"कार भीष्माचार्यही अपवाद नाहीत· "पंचवार्तिक"कार भीष्माचार्यांनी आपल्या चरित्राबद्दल फारसा उल्लेख कुठेच केलेला नसल्याने त्यांचा कालखंड, गुरूपरंपरा, त्यांचे इतर लेखनसाहित्य तसेच भीष्माचार्य निश्चित कोणत्या आम्नायातील असावेत; या बाबींवर निश्चित असा प्रकाश टाकता येत नाही·

महंत दत्तराज् यांनी, पं·भीष्माचार्यांच्या पूर्वचरित्रावर प्रकाश टाकणा-या भीष्माचार्यांच्या "मुक्तामाला" या ग्रंथाचा उल्लेख केला आहे· या ग्रंथात भीष्माचार्यांनी स्वतःबद्दल थोडी माहिती दिलेली आहे·

"विप्र नागनाथाः मुनि नागदेवे : दृढाग्विले भावें : ज्ञानरोपा ।। २२१ ।।
विप्रे नागदेवे : मुनि बोपदेवां : हाच ज्ञानठेवा : निरोपिला ।।२२२।।
बोपदेवा मुखे : मज पै श्रवण : जाले हे गहन : ज्ञानमात्रे ।। ।।२२३।।" [१६]

"मुक्तामाला" ग्रंथातील वरील ओळींवरुन, पं·बोपदेव हे भीष्माचार्यांचे गुरू असून त्यांच्यापासून त्यांना "श्रवण" झाले, अशी माहिती मिळते·

पं·भीष्माचार्य यांचा जन्म सारस्वत ब्राह्मणकुळात झालेला असून त्यांच्या पित्याचे नांव विश्वेश्वराचार्य होते· हे कुटुंब मूळचे काशीचे असावे· काशीहून हे कुटुंब देवगिरीस रामदेवराय यादवांचे प्रधान जे हेमाद्रिपंडित होते, त्यांच्या आश्रयास आले· अशाप्रकारे या कुटुंबाचा महाराष्ट्रात प्रवेश झाला· याचवेळी पं·बोपदेव यांचा या कुटुंबाशी संपर्क आला आणि या कुटुंबातील भीष्माचार्यांनी पं·बोपदेवांचे शिष्यत्व पत्करले·[१७] पं·बोपदेव हे भीष्माचार्यांचे विद्यागुरू तर उपाध्ये आम्नायातील "हेतुस्थळ" कर्ते न्यायबास हे दीक्षागुरू होत· पं·भीष्मचार्यांच्या चरित्राबद्दल यापेक्षा अधिक माहिती मिळत नाही· त्यामुळे ते लिखानाकडे कसे वळले , याचाही बोध होणे कठीण आहे· महानुभाव पंथातील इतर साहित्यिकांनी ज्या उद्देशांनी वाङ्मयरचना केली· त्याच उद्देशांनी पं·भीष्माचार्यांनीही साहित्य लिहिले असले पाहिजे· पंथनिष्ठा व पंथप्रचार हीच भीष्माचार्यांच्या वाङ्मयलेखनीचीही खरी प्रेरणा होती· महानुभाव पंथाच्या वाङ्मयाचे अध्ययन मराठी भाषिक लोकांना व्यवस्थित करता यावे, त्यांना वाङ्मयाचे आकलन नीट व्हावे, यासाठी त्यांनी भाषाशास्त्रावर "नामविभक्ती" व व्याकरणशास्त्रावर "पंचवार्तिक" असे दोन ग्रंथ लिहिले·

"पंचवार्तिक" ग्रंथाच्या हस्तलिखित स्वरूपातील ज्या प्रती उपलब्ध झाल्या· त्या उपलब्ध प्रतींपैकी सर्वात प्राचीन प्रत शके १५०६ मधील आहे· या पोथीचा समाप्तिलेख असा आहे -

"तैचि ब्रह्मविद्येची व्युत्पत्ति होए एऱ्हवी सूत्रस्वरूप परमेश्वरूप दुखवीने घडे मणौनि पंचवार्तिक गुरूमुखे अभ्यासाविचि लागे ते संपुर्णत्व होए· ईति श्री परधर्म महामोक्षेक साधने श्री नागार्जुनोपदेश उपाध्यायाम्नायदिक्षित

श्री पंडित भिष्माचार्यविरचित पंचवार्तिक समाप्त· हस्ताक्षेर दैत्यारि यक्षदेवाचे· सके १५ पंधराशे साहोत्तरी ।। तारणुनामे सवंछ्ररी । कृष्ण जन्माष्टमी मंगळवारी ।। कपीला शर्ष्टीए १ श्री बोपदेवार्पण श्री न्यायेबास शोधीत पंचवार्तिक समाप्त· श्री म्हास्थान पमरेश्वरपुर वार तिथी मध्यान्हे लेखन समाप्त सके १५०६ तारण वरुखे. श्रावण वद्य कपिला शष्टी कृष्लार्पन मस्थू·"[१८]

"पंचवार्तिका"च्या या "शोधन"रूपी पोथीच्या समाप्तिलेखातून पुढील गोष्टी स्पष्ट होतात -

१. "पंचवार्तिक"कार पं·भीष्माचार्य हे उपाध्याय आम्नायातील होत·

२. पं·भीष्माचार्यांनी पंचवार्तिकाची ही प्रत आपले गुरु पं·बोपदेव यांना अर्पण केली आहे·

३. या पोथीची लेखनसमाप्ती शके १५०६ मधील आहे·

४. पंचवार्तिकाचे शोधन न्यायबासांनी शके १२७५ मध्ये केलेले आहे·

५. पोथीलेखनाचे ठिकाण परमेश्वरपूर म्हणजे ऋध्दिपूर आहे·

६. ब्रह्मविद्येचे ज्ञान होण्यासाठी आणि सूत्रस्वरूप परमेश्वर दुखविला जाऊ नये म्हणून "पंचवार्तिका"चे लेखन आहे·

७. "पंचवार्तिका"चा अभ्यास गुरुमुखे केल्यास अभ्यासाला संपूर्णत्व प्राप्त होते· अशी या ग्रंथाच्या अभ्यासामागील धारणा आहे·

न्यायवासांनी "पंचवार्तिकां"चे शोधन शके १२७५ मध्ये केले· म्हणजे शके १२७५ पूर्वी "पंचवार्तिका"ची रचना झालेली असली पाहिजे, हे उघड आहे· पं·बोपदेवही याच काळातील म्हणजे तेराव्या शतकातीलच आहेत· यावरून हे स्पष्ट होते की, रामदेवराय यादवाचा प्रधान हेमाद्रिपंडित यांच्या आश्रयाला आलेल्या कुटुंबातील, पं·बोपदेवशिष्य भीष्माचार्य हाच "पंचवार्तिका"चा कर्ता असला पाहिजे·

## पं·भीष्माचार्यांचे वाड्मयीन कर्तृत्व

तेराव्या शतकापासून सोळाव्या शतकापर्यंत महानुभाव पंथात "भीष्माचार्य" नावाच्या जवळजवळ आठ व्यक्ती होऊन गेल्या· या नावांच्या सारखेपणामुळे "पंचवार्तिक"कार

भीष्माचार्यांच्या वाङ्मयाचे शोधन करतानाही अडचणी येतात. "पंचवार्तिक"कार भीष्माचार्यांनी तीस-बत्तीस ग्रंथ लिहिले असल्याचा उल्लेख "महाराष्ट्र सारस्वता"त सापडतो.[१९] पं.बोपदेवशिष्य भीष्माचार्य म्हणजेच "पंचवार्तिक"कार भीष्माचार्य हे निश्चित मानले तर त्यांच्या नावावर एकोणतीस ग्रंथ असल्याचे डॉ.व.दा.कुलकर्णी सांगतात.[२०] ही नोंद वि.ल.भावे यांच्या कविकाव्यसूचीत असल्याचे कुलकर्णी यांनी सांगितले आहे. त्यापैकी संशोधन करताना उपलब्ध झालेली ग्रंथांची नांवे याप्रमाणे आहेत.

१. लक्षणरत्नाकर भाष्य / बत्तीस लक्षणांची टीप

दिनकर प्रबंध

दत्तात्रय प्रबंध

धाराबिंब संज्ञिक

महाराष्ट्र सुबोधिनी

"धनंजयकोशा"वरील टीका

"अंताक्षरी"वरील टीका

ऋध्दिपूर महात्म्य

श्री चक्रधरस्तोत्र

मार्ग मंजिरीस्तोत्र

मार्ग प्रभाकर

गद्यराज

लक्षणसारोध्दार

सिध्दांतसार

पदार्थदीपिका

निरूक्त प्रकरणवश

नामविभक्ती

पंचवार्तिक

मूर्तीज्ञान

मुक्तामाला

नाममाला

स्मरणमाला

प्रसादमाला

सुभाषिते

## पं·भीष्माचार्यांच्या वाङ्मयाचे स्वरूप

पं·भीष्माचार्य यांनी पंथनिष्ठेच्या प्रेरणेने व पंथप्रचाराच्या उद्देशाने साहित्यलेखन केले असले तरी वाङ्मयीनदृष्टया त्यांची रचना वैविध्यपूर्ण आहे· मराठी आणि संस्कृत या दोन्ही भाषेत त्यांनी लेखन केले· वैविध्याने नटलेल्या त्यांच्या साहित्यात पंथीय तत्वज्ञानाबरोबरच पंथाचा आचारधर्म सांगणारे ग्रंथही आहेत· स्थलवर्णने, स्तोत्रे, सुभाषिते, प्रबंध, टीका, भाष्य, छंदशास्त्र, भाषाशास्त्र, व्याकरण अशा वाङ्मयप्रकारात त्यांनी लेखन केले आहे·

पं·भीष्माचार्यांची संस्कृत भाषेत विव्दत्तापूर्ण रचना केलेली आढळते· "दिनकरप्रबंध" व "धाराबिंबसंज्ञिक" हे ग्रंथ त्यांनी संस्कृतमध्ये लिहिले· श्रीकृष्णचरित्राचे वर्णन असणारे व भीष्माचार्यांच्या नावावर मोडणारे "गद्यराज" हे काव्य इ·स· १९०३ मध्ये "ग्रंथमाले"तून प्रसिध्द करण्यात आले· या काव्यात एकूण ३०० श्लोक आहेत·[२१] "महाराष्ट्र सारस्वत"-कारही "गद्यराज" हा काव्यग्रंथ "पंचवार्तिक"कार भीष्माचार्यांचाच असल्याचे सांगतात·[२२] "ऋध्दिपूरवर्णना"वर भीष्माचार्यांनी एक स्वतंत्र टीपग्रंथ लिहिल्याचे डॉ·य·खु·देशपांडे सांगतात·[२३] "मार्गमंजिरीस्तोत्र" व "श्रीचक्रधरस्तोत्र" असे दोन श्लोकबध्द स्तोत्रग्रंथही पं·भीष्माचार्यांच्या नांवावर नोंदलेले आहेत·[२४]

"निरूक्ती प्रकरणवश" हा निरूक्तशेषाच्या धर्तीवरचा एक ग्रंथ भीष्माचार्यांचा आहे· हा ग्रंथ अनुपलब्ध असून "महाराष्ट्र सारस्वत"कारांनी तो, पहिला भीष्माचार्य वाइंदेशकर म्हणजेच "पंचवार्तिक"कार भीष्माचार्यांच्या नांवावर नोंदलेला असल्याचे सांगितले आहे·[२५] पं·भीष्माचार्यांनी "नाममाला", "स्मरणमाला", "मुक्तामाला", "प्रसादमाला", "मूर्तिज्ञान" हे ग्रंथ लिहून भक्तिपर रचनाही केली आहे· यांतील "मुक्तामाला" या २२७ अभंगाच्या भक्तिपर ग्रंथात भीष्माचार्यांनी स्वतःच्या चरित्राबद्दल थोडीशी माहितीही दिलेली आहे· भीष्माचार्यांनी काही "सुभाषिते" लिहिली असल्याचाही उल्लेख आढळतो· याशिवाय "लक्षणसारोध्दार", "सिध्दांतसार", "दत्तात्रयप्रबंध" हे ग्रंथही त्यांच्या नावावर असल्याचे दिसून येते·

गोपाळ पंडित उर्फ आनेराजबास यांच्या "लक्षणरत्नाकर" या संस्कृत ग्रंथावर त्यांनी मराठी भाषेत "बत्तीस लक्षणांची टीप" हे भाष्य लिहिले. ८१० ओव्यांचा "मार्गप्रभाकर" हा छंदशास्त्रावरील एक ग्रंथ भीष्माचार्यांचा आहे. या ग्रंथात भक्ति, ज्ञान, वैराग्य यांचा पुरस्कार करण्यात आला आहे. या ग्रंथाचा कालखंड ज्ञात नाही. सूत्रांचे व्याकरण लिहिणारा, अर्थनिर्णयशास्त्रावर टीप लिहिणारा आणि साहित्यशास्त्रातही शिरणारा "भीष्माचार्य" एकच असावा, असा तर्क मांडावासा वाटतो.[२६] "धनंजयकोशा"वर एक व "अंताक्षरी"वर एक असे टीकाग्रंथ त्यांनी लिहिलेले आहेत. जयदेवाच्या "गीतगोविंदा"वर "महाराष्ट्र सुबोधिनी" नावाची टीकाही भीष्माचार्यांनी लिहिली आहे. याशिवाय मराठी भाषाशास्त्रावर "नामविभक्ती" हा व मराठी व्याकरणशास्त्रावर "पंचवार्तिक" असे दोन महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहून पं.भीष्माचार्यांनी मराठी वाङ्मयात मोलाची भर घातली आहे. "पंचवार्तिकात" सूत्रलक्षण, सूत्रप्रकृतिलक्षण, सूत्रकारकलक्षण, सूत्रव्याख्यानलक्षण व सूत्रस्वरूपलक्षण या, वार्तिकाच्या पाच अंगांचे विवेचन त्यांनी केले आहे. व्याकरणपंडित भीष्माचार्यांनी "पंचवार्तिक" लिहून मराठी वाङ्मयात "आद्य मराठी व्याकरणकार" होण्याचा मान मिळविला आहे, असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. पं.भीष्माचार्यांच्या ग्रंथलेखनाची विविधता पाहता असे दिसून येते की, मराठी भाषा शिकू इच्छिणा-यांसाठी व मराठी भाषेचा अभ्यास करू इच्छिणा-या अभ्यासकांसाठीही त्यांचे ग्रंथ उपयुक्त ठरू शकतील.

## :::: संदर्भ ::::


१. वि·ल·भावे, **महानुभाव महाराष्ट्र ग्रंथावली कविकाव्यसूचि**, ठाणे, श·१८४६, पृ· १९।२०.

व·दा·कुलकर्णी, "पंचवार्तिक" **महानुभाव**, महन्त श्री नागराजबाबा महानुभाव (संपा), व· ४४ वे, अं· १ व २ , औरंगाबाद, (एप्रिल-मे१९९१),पृ· ५ वरून उद्धृत

२. वि·ल·भावे, **महाराष्ट्र सारस्वत**, पा·आ·, मुंबई,१९६३ , पृ· १८१ । १८३.

३. शं·गो·तुळपुळे, **महाराष्ट्र सारस्वत** (पुरवणी), पा·आ·, मुंबई १९६३, पृ· ७४७.

४. अ·ना·देशपांडे, **प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास**, भाग दुसरा, पुणे, १९७३, पृ· २२२ । २२३.

५. व·दा·कुलकर्णी, उ·नि·, पृ· ६

६. ह·ना·नेने (संपा·), **पं·आनेराजबासकृत लक्षणरत्नाकर**, नागपूर, १९३७ उपोद्घात, पृ· ३७

व·दा·कुलकर्णी, उ·नि·, पृ· ६ वरून उद्धृत·

७. भीमराव कुलकर्णी, "महानुभावीय वाड्मय", **मराठी वाङ्मयाचा इतिहास**, खंड 2रा, भाग पहिला, स·ग·मालशे (संपा·), पुणे, १९८२,पृ· ५१०।५११.

८. तत्रैव, पृ·५१०.

९. तत्रैव, पृ·५११.

१०. तत्रैव, पृ· ५११.

११. य·खु·देशपांडे, **महानुभावीय मराठी वाङ्मय**, यवतमाळ, १९२५ , पृ· ४२ व५७ ५८.

व·दा·कुलकर्णी, उ·नि·, पृ· ६ वरून उद्धृत·

१२. य·खु·देशपांडे (संपा·), **पं·भीष्माचार्य संकलित निरुक्तशेष**, नागपूर, १९६१,भूमिका पृ· १३।१४.

व·दा·कुलकर्णी, उ·नि·पृ· ७ वरून उद्धृत·

१३. भीमराव कुलकर्णी, उ·नि·, पृ·५१८.

१४. व·दा·कुलकर्णी, उ·नि·, पृ· ७.

१५. प्र·न·जोशी, **मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास**,सु·दु·आ·, पुणे,१९७८,पृ· १२४.

१६. मो·स·मोने, **मराठी भाषेचे व्याकरणकार व व्याकरण**, पुणे, १९२७ , पृ·८५ वरून.

व·दा·कुलकर्णी, उ·नि·, पृ· ८ वरून उद्धृत·

१७. तत्रैव, पृ· ८ वरून उद्धृत

१८. भीमराव कुलकर्णी, उ·नि·, पृ· ५११ .

१९. वि·ल·भावे, महाराष्ट्र सारस्वत, उ·नि·, पृ· १८१.

२०. व·दा·कुलकर्णी, उ·नि·, पृ· ५.

२१. अ·ना·देशपांडे, उ·नि·, पृ· ३००.

२२. शं·गो·तुळपुळे, उ·नि·, पृ· ७४८।७४९.

२३. अ·ना·देशपांडे, उ·नि·, पृ· २३५.

२४. तत्रैव, पृ· २८९.

२५. तत्रैव, पृ· २२४। २२५.

२६. भीमराव कुलकर्णी, उ·नि·, पृ· ५३२.